# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः26.12.2024** **वारःगुरुवार**

---

1. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीचे देशाच्या जलस्त्रोतांचे बळकटीकरण करण्यात योगदान-पंतप्रधानांचे गौरवोद्गार
2. दहा हजारांहून अधिक बहुउद्देशीय प्राथमिक संस्था देशाला समर्पित
3. प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कारांचं राष्ट्रपतींच्या हस्ते आज वितरण
4. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यांमध्ये यावर्षी ऑक्टोबरमध्ये 13 लाखांपेक्षा अधिक सदस्यांची वाढ आणि
5. भारत-ऑस्ट्रेलिया चौथ्या क्रिकेट सामन्यात यजमान फलंदाजांची कसोटी

**केन-बेतव**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या दूरदृष्टीने देशाच्या जलस्त्रोतांचे बळकटीकरण, व्यवस्थापन आणि धरण बांधणीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल काढले. मध्यप्रदेशातील खजुराहो इथं बहुउद्देशीय केन बेतवा नदीजोड प्रकल्पाची पायाभरणी काल त्यांच्या हस्ते झाली. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षपुर्तीनिमित्त आयोजित कार्यक्रमांत हा सोहळा पार पडला. त्यावेळी ते बोलत होते.

या प्रकल्पा बरोबरच देशाचा पहिला ओमकारेश्वर तरंगता सौर उर्जा प्रकल्प आणि अकराशेहून अधिक अटल ग्राम सुशासन भवनांचं भुमीपुजनही पंतप्रधानांच्या हस्ते झालं. केन बेतवा राष्ट्रीय नदीजोड प्रकल्पामुळे 8 लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात सिंचन सुविधा उपलब्ध होणार आहे. मध्य प्रदेशातील 10 जिल्ह्यांतील 2 हजार गावांतील 7 लाखांहून अधिक शेतकरी कुटुंबांनाही याचा लाभ होणार आहे. तसंच 44 लाख लोकांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, 103 मेगावॅट जलविद्युत आणि 27 मेगावॅट सौरऊर्जेची निर्मिती होणार आहे. या प्रकल्पामुळे दुष्काळग्रस्त बुंदेलखंड प्रदेशातील भूजल पातळीची स्थिती सुधारेल, औद्योगिकीकरणाला चालना मिळेल, गुंतवणूक आणि पर्यटन वाढेल आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. असं पंतप्रधान यावेळी बोलताना म्हणाले.

**अमित शहा**

केंद्र सरकार ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी सहकार क्षेत्राला बळकटी देत आहे अशी ग्वाही केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्ली दिली. दहा हजारांहून अधिक नव्याने स्थापन झालेल्या बहुउद्देशीय प्राथमिक कृषी सहकारी संस्था, दुग्ध आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यक्रमांत राष्ट्राला समर्पित करण्यात आल्या. त्यावेळी ते बोलत होते. अशा नव्याने स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना नोंदणी प्रमाणपत्रं, रुपे किसान क्रेडिट कार्ड आणि मायक्रो एटीएमचे वाटप यावेळी त्यांच्या हस्ते करण्यात आलं. ही आर्थिक साधने पंचायतींमध्ये कर्ज सुविधा सहज उपलब्ध करून देण्यासाठी आणि सर्वांच्या आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी तयार करण्यात आली आहेत. या उपक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा माल जागतिक बाजारपेठेत सहज पोहोचेल. असा विश्वास शहा यांनी व्यक्त केला.

**सुशासन दिन**

देशातील प्रत्येक नागरिकापर्यंत सुशासन पोहोचवण्याच्या उद्देशानं सुशासन दिनानिमित्त विकसित पंचायत कर्मयोगी उपक्रमाचा शुभारंभ काल कार्मिक, सार्वजनिक तक्रारी आणि निवृत्ती वेतन राज्यमंत्री, डॉ. जितेंद्र सिंह यांच्या हस्ते झाला. निवडून आलेले प्रतिनिधी आणि अधिकारी यांना प्रभावी प्रशासनासाठी आवश्यक साधनं आणि माहिती पुरवणं, पंचायती राज

संस्थांची क्षमता वाढवणं हा या उपक्रमाचा उद्देश आहे. माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांचा जन्मदिवस सुशासन दिन म्हणून साजरा केला जातो.

**राष्ट्रीय बाल पुरस्कार**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज नवी दिल्लीत सात श्रेणींमध्ये, 17 बालकांना 'प्रधानमंत्री राष्ट्रीय बाल पुरस्कार' प्रदान करणार आहेत. 14 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील या बालकांनी कला आणि संस्कृती, शौर्य, नवोन्मेष, विज्ञान आणि तंत्रज्ञान, समाजसेवा, क्रीडा आणि पर्यावरण या क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रत्येक पारितोषिक विजेत्याला पदक, प्रमाणपत्र आणि प्रशस्तीपत्रक दिले जाईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं वीर बाल दिवस कार्यक्रमांत सहभागी होणार आहेत. आजच्या सोहळ्यात महाराष्ट्रातील सांगली शिक्षण संस्थेचं पथक महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करत असून लेझीम कलाप्रकाराचं प्रात्याक्षिक सादर केलं जाणार आहे. संस्थेतील 18 विद्यार्थिनी सह 4 वादक, 1 व्यवस्थापक आणि 1 संघ प्रमुख असा 24 जणांचा संघ दिल्लीत दाखल झाला आहे. गुरु गोविंद सिंग यांचे पुत्र साहिबजादे, यांच्या कार्याची आठवण म्हणून वर्ष 2022 पासून, 26 डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जातो.

वीर बाल दिनानिमित्त देशभरांत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. MyGov आणि MyBharat पोर्टलद्वारे ऑनलाइन प्रश्नमंजुषा तसंच इतर स्पर्धांची मालिका आयोजित करण्यात येणार आहे. शाळा, बाल संगोपन संस्था आणि अंगणवाडी केंद्रांमध्ये कथाकथन, निबंधस्पर्धा आदी अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत.

सुपोषित ग्रामपंचायत अभियानाचा शुभारंभ पंतप्रधानांच्या हस्ते आज होणार आहे. सर्व स्तरावर पोषण संबंधित सेवांची अंमलबजावणी करणं आणि यासंबंधीत सक्रिय समुहांचा एकत्रित सहभाग सुनिश्चित करून पोषणामुळे होणाऱ्या चांगल्या परिणामांचं महत्व सर्वांपर्यंत पोहोचवण हा उपक्रमाचा उद्देश आहे.

**EPFO - सदस्य**

कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने यावर्षी ऑक्टोबरमध्ये 13 लाख 41 हजार सदस्यांची निव्वळ वाढ नोंदवली आहे. कामगार आणि रोजगार मंत्रालयाने सांगितलं की, वाढत्या रोजगाराच्या संधी, कर्मचाऱ्यांच्या लाभांबाबत वाढलेली जागरूकता आणि EPFO च्या प्रभावी संपर्क उपक्रमांमुळे सदस्यांची संख्या वाढली आहे. पगाराच्या हंगामी आकडेवारीवरून वर्तमान आर्थिक वर्षाच्या ऑक्टोबरमध्ये ईपीएफओने सुमारे 7 लाख 50 हजार नवीन सदस्यांची नोंदणी केली असं दिसून आलं. या आकडेवारीमध्ये 18 ते 25 वयोगटातील कर्मचारी सर्वाधिक आहेत, या कालावधीत समाविष्ट झालेल्या एकंदर सदस्यांपैकी त्यांचं प्रमाण 58 टक्के होतं.

**एनडीए नेते**

भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि केंद्रीय मंत्री जगत प्रकाश नड्डा यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या NDA नेत्यांची काल नवी दिल्लीत बैठक झाली. आघाडीतील भागीदारांमध्ये समन्वय भक्कम करण्याचा या बैठकीचा उद्देश होता. तेलुगू देसम पक्षाचे अध्यक्ष आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, जनता दल (संयुक्त) नेते आणि केंद्रीय पंचायत राज मंत्री राजीव रंजन सिंह, जनता दल (धर्मनिरपेक्ष) नेते आणि केंद्रीय अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी या बैठकीला उपस्थित होते. हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे नेते आणि केंद्रीय एमएसएमई मंत्री जीतन राम मांझी, अपना दल (सोनेलाल) अध्यक्ष आणि केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री अनुप्रिया पटेल आणि राष्ट्रीय लोक मोर्चाचे अध्यक्ष उपेंद्र कुशवाह यांनीही या बैठकीला हजेरी लावली.

**बस अपघात**

उत्तराखंडमध्ये नैनिताल जिल्ह्यातील भीमताल इथं राज्य परिवहन महामंडळाची बस खोल दरीत कोसळल्याने 4 जणांचा मृत्यू झाला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 28 जणांना घेऊन ही बस पिठोरागढहून हल्द्वानीला जात होती. 24 प्रवासी जखमी झाले असून त्यांना हल्द्वानी इथल्या सुशीला तिवारी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी

मदत आणि बचाव कार्य पूर्ण करण्यात आले आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

**<u>विमान अपघात</u>**

कझाकस्तानमध्ये, काल झालेल्या विमान अपघातात 38 नागरिक ठार झालेयाची प्राथमिक माहिती अझरबैजानच्या अधिकाऱ्यांनी दिली. अझरबैजान एअरलाइन्सच्या या प्रवासी विमानानं अकताऊशहराजवळ आपत्कालीन लँडिंग करण्याचा प्रयत्न केला मात्र विमानाला आग लागली आणि अपघात झाला अशी माहिती कझाकस्तानच्या माध्यमांनी दिली आहे. हे विमान रशियातील ग्रोझनीला जात होते पण दाट धुक्यामुळे ते वळवण्यात आले. रशिया, कझाकस्तान आणि किर्गिस्तानचे नागरिक आणि विमानातील कर्मचारी असं 70 जण प्रवास करत होते. अझरबैजान आणि कझाकस्तान या दोन्ही देशांनी अपघाताची चौकशी सुरू केली आहे.

**<u>मोझांबिक- कैदी</u>**

विवादित निवडणूक निकालांमुळे सुरू असलेल्या राजकीय अशांततेचा फायदा घेऊन मोझांबिकमधील तुरुंगातून दीड हजारहून अधिक कैदी पळून गेले आहेत. सुरक्षारक्षकांसोबत झालेल्या चकमकीत तेहतीस जण ठार तर 15 जण जखमी झाले आहेत. पोलिस प्रमुख बर्नार्डिनो राफेल यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं की, मोझांबिकच्या सर्वोच्च न्यायालयाने 1975 पासून सत्तेत असलेल्या फ्रेलिमो पक्षानं ऑक्टोबरच्या अध्यक्षीय निवडणुकीत विजय मिळवल्याची पुष्टी केल्यानंतर सोमवारी निदर्शनं सुरू झाली. सरकारविरोधी निदर्शकांचे गट राजधानी मापुटो इथल्या तुरुंगात आले होते. कैद्यांनी या संधीचा फायदा घेत तुरुंगाची भिंत पाडून पळ काढला.

**<u>जसप्रीत बुमराह</u>**

भारताचा वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटनेनं पुरुषांच्या कसोटी गोलंदाजी क्रमवारीत उल्लेखनीय कामगिरी दर्शवत सर्वोच्च स्थानी झेप घेतली आहे. 904 रेटिंग पॉइंट्स गाठत फिरकी गोलंदाज रविचंद्रन अश्विनशी बरोबरी साधली आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि ऑस्ट्रोलियादरम्यान बॉर्डर गावस्कर करंडल स्पर्धेत आज मेलबर्न इथं चौथा कसोटी क्रिकेट सामन्याला आज सकाळी सुरुवात झाली. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय ऑस्ट्रेलिया संघानं घेतला असून यजमानांच्या आतापर्यंत 1 ग़डी बाद 133 धावा झाल्या आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.